जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६५६ दिनांक - २९/०८/२०२३**

**सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर**

**तीन पत्ती जुगार अड्डयावर छापा टाकुन १० इसमावर कारवाई करून रोख ४१,६२०/- रू व १४,१००/- रू.किचे हुक्क्याचे प्लेवर व साहित्य तसेच ५,२३,०००/- रू किंचे मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकुण ५,७८,७२०/- रू.कि.चा मुद्देमाल जप्त.**

दि.२८.०८.२०२३ रोजी ॲमनोरा पार्क,हडपसर,पुणे परीसरात काही इसम बेकायदेशीरपणे तीन पत्ती जुगार खेळत व खेळवत असलेबाबत प्राप्त झालेल्या गोपनिय बातमीदार मार्फतीने खात्रीशीर बातमी मिळाली.

सदर ठिकाणी सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे,शाखेकडील अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी गोपनीयरित्या पाळत ठेवुन छापा टाकला असता काही इसम बेकायदेशीरपणे तीन पत्ती जुगार पैसे लावुन खेळत व खेळवत असल्याचे तसेच हुक्क्याचे सेवन करीत असताना मिळुन आल्याने १० इसमावर कारवाई करून रोख ४१,६२०/- रू व १४,१००/- रू किचे हुक्कयाचे प्लेवर व साहित्य तसेच ५,२३,०००/- रू. किंमतीचे मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकुण ५,७८,७२०/- रू किचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी जुगार खेळताना मिळुन आलेले १० इसमांविरूध्द **हडपसर पोलीस स्टेशन येथे गुरनं १२९१/२०२३,महाराष्ट्र जुगार बंदी अधिनियम कलम ४(अ)५ व सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ चे कलम ४(अ)२१ (अ)** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला व त्यांना पुढील कारवाई करीता हडपसर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे पुणे श्री.अमोल झेंडे यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. भरत जाधव तसेच सपोनि.अनिकेत पोटे, सपोनि.राजेश माळेगावे, पोलीस अंमलदार,राजेंद्र कुमावत, तुषार भिवरकर, सागर केकाण, अमय रसाळ, हणमंत कांबळे, संदीप कोळगे, अमित जमदाडे, किशोर भुजबळ या पथकाने यशस्वी केली आहे.